कुलाबा-वांद्रे-सीप्झ मुंबई मेट्रो-३

मेट्रो-३च्या भुयारीकरणाचा ३४ वा टप्पा 'पूर्ण

मुंबई, नोव्हेंबर ६, २०२० - मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन(मुं.मे.रे.कॉ) द्वारे चर्चगेट ते हुतात्मा चौक हा ६४८ मी. इतका लांब ३४ वा भुयारीकरणाचा टप्पा आज यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आला. एकूण ५०६ रिंग्जच्या सहाय्याने २९२ दिवसात हे अप लाईन मार्गाचे भुयारीकरण पूर्ण करण्यात आले. सूर्या-१ या रॉबिन्स बनावटीच्या ड्युएल-मोड हार्ड-रोक टनेल बोअरिंग मशीनद्वारे हे भुयारीकरण पूर्ण करण्यात आले आहे .

हुतात्मा चौक स्थानक मेट्रो-३ मार्गावरील एक महत्त्वाचे स्थानक आहे. या स्थानकामुळे चर्चगेट रेल्वे स्थानक, काही देशांचे दूतावास, मुंबई उच्च न्यायालय, विविध बँकांचे व वितीय संस्थांची मुख्यालये, बॉम्बे स्टॉक एक्सचेंज, बलार्ड इस्टेट, विविध इस्पितळे, महाविद्यालये, वानखडे व ब्रेबॉर्न स्टेडियम, जहांगीर आर्ट गॅलरी, राष्ट्रीय आधुनिक कला संग्रहालय, एशीयाटिक लायब्ररी, गेट वे ऑफ इंडिया, व विविध उपहारगृहे इत्यादी स्थळांना पोहचणे अधिक सुलभ होणार आहे " असे मुं.मे.रे.कॉचे व्यवस्थापकीय संचालक श्री. रणजित सिंह देओल म्हणाले.

पॅकेज-१ अंतर्गत कफ परेड , विधान भवन , चर्चगेट आणि हुतात्मा चौक या मेट्रो स्थानकांचा समावेश असून हुतात्मा चौक स्थानकाचे एकूण ५३% काम पूर्ण झाले आहे. पॅकेज-१ मध्ये एकूण ८१% भुयारीकरण आणि ७०% बांधकाम पूर्ण झाले आहे.

मेट्रो-३ प्रकल्पाचे आतापर्यंत एकूण ८९% भुयारीकरण व ६१% बांधकाम पूर्ण झाले आहे. (समाप्त)

For further information please contact: -

Vaidehi More

9028543087

vaidehi.more@mmrcl.com

Niti Tamse

8369727364/ 9664215544

niti.tamse@mmrcl.com